

# घरगुती पाण्याच्या क्षेत्रातील विकेंद्रीकरण आणि त्यामधील स्त्रियांचा सहभाग

## काही निरीक्षणे आणि सूचना

### प्रस्तावना

भारतामध्ये ९०च्या दशकापासूनच जलक्षेत्रसुधार आणि त्याचबरोबर विकेंद्रीत स्थानिक राज्यकारभार यांच्या पर्वाला सुरुवात झाली. त्याबरोबरच सरकारची 'मागणीप्रमाणे पुरवठा करणारे' ही भूमिका 'मागणीला प्रोत्साहन देणारे' आणि 'स्थानिक पातळीवरील व्यवस्थापनासाठी क्षमता वाढवणारे' अशी बदलली. या संरचनात्मक बदलांमागे पाणी हे आता 'विनामूल्य' राहिलेले नाही; तसेच कार्यक्षम, समन्यायी आणि शाश्वत पाणी वाटपासाठी विकेंद्रीत व्यवस्थापन हा एकमेव मार्ग आहे ही जाणीव कारणीभूत होती.

या क्षेत्रसुधार कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ठ्ये पुढील प्रमाणे सांगता येतील : गावपातळीवर पिण्याच्या पाण्याच्या योजनांची अंमलबजावणी, पाणी समित्यांची स्थापना आणि त्यांच्यामार्फत पाण्याचे व्यवस्थापन, भांडवलामध्ये १०% वाटा आणि संपूर्ण देखभाल दुरुस्ती लोकसहभागातून, अंतिम निर्णय घेण्याचा हक्क ग्रामसभेचा आणि व्यवस्थापन सक्षमपणे होण्यासाठी समित्यांची क्षमता बांधणी.

या धोरणांमध्ये प्रकल्पामधील स्त्रियांच्या सहभागावर विशेष भर दिला गेला आहे. स्त्रियांसाठी समित्यांमध्ये कोटा देण्यात आला आहे. स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा मानणाऱ्या या धोरणांमध्ये एकीकडे स्त्रियांचा सहभाग हे प्रकल्प यशस्वी करण्याचे 'साधन' असल्याचे तर दुसऱ्या बाजूला त्यामुळे स्त्रियांना आपले प्रश्न मांडण्यासाठी जागा उपलब्ध होईल; त्यामुळे ते एक स्वतंत्र उद्दिष्ट असल्याचे म्हटले आहे. परंतु स्थानिक पातळीवरील (कुटुंब आणि समुदाय) तसेच क्षेत्रसुधार प्रकल्प राबवणाऱ्या संस्थांमधील लिंगभावआधारित सत्तासंबंध, तसेच लिंगभावाबरोबरच जात, वर्ग, वय, धर्म इत्यादी घटकांच्या आधारावर येणारी वंचितता यामुळे केवळ समित्यांमध्ये स्त्रियांना जागा देणे पुरेसे होणार नाही.

### अभ्यासाची उद्दिष्टे आणि अभ्यासपद्धती

विकेंद्रीत व्यवस्थापनातील स्त्रियांचा सहभाग समजून घेण्यासाठी आम्ही एक अभ्यास केला. या अभ्यासामध्ये खालील गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

- ग्रामीण स्त्रियांच्या पाण्याच्या व्यवस्थापनातील सक्षम सहभागावर परिणाम करणारे सकारात्मक आणि नकारात्मक घटक कोणते आहेत?
- स्त्रियांच्या अशाप्रकारच्या सहभागामुळे पाण्याच्या संसाधनांचे शाश्वत आणि समानतेच्या तत्त्वांवर आधारित व्यवस्थापन होण्यावर काय परिणाम होतो?
- स्त्रियांचा विकेंद्रीत व्यवस्थापनातील सहभाग शक्य किंवा अशक्य करणारे विविध आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय घटक कोणते आहेत?
- व्यवस्थापन समित्यांमध्ये कोणत्या स्त्रिया सहभागी होतात आणि का? आणि या सहभागाची काय किंमत त्यांना द्यावी लागते?

महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांमधील १७ गावांची निवड आम्ही अभ्यासासाठी केली होती. यामध्ये वेगवेगळ्या भौगोलिक भागातील, विविध सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या आणि प्रकल्पाच्या विविध टप्प्यांवर असणाऱ्या गावांचा समावेश होता.

विविध सामाजिक गटांमधील ११४ समिती सदस्य स्त्रियांच्या आम्ही मुलाखती घेतल्या. तसेच विविध पातळ्यांवरील सरकारी अधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्याशी मुलाखतीद्वारे तर समितीवरील सदस्य, गावातील विविध जातींचे आणि वर्गांचे लाभधारक यांच्याशी गटचर्चांद्वारे संवाद साधला.






## महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्यासाठीचे अभ्यासक्षेत्र




## महाराष्ट्रातील विकेंद्रीकरण : जलस्वराज्य आणि आपले पाणी

जलक्षेत्र सुधार धोरण सर्वप्रथम स्विकारणाऱ्या देशातील काही राज्यांपैकी महाराष्ट्र एक आहे. ग्रामीण भागातील लोकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी राबवलेल्या आधीच्या योजनांच्या अपयशावर पर्याय म्हणून विकेंद्रीत पाणीपुरवठ्याच्या योजनांची सुरुवात करण्यात आली. २००५ मध्ये महाराष्ट्र सरकारने केलेल्या सर्वेक्षणानुसार सुमारे ३५ हजार गावांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारे सहाय्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले.

महाराष्ट्रात जलस्वराज्य आणि आपले पाणी हे पिण्याच्या पाण्यामधील दोन प्रमुख प्रकल्प आहेत. त्यांची रचना केंद्र सरकारच्या स्वजलधारा प्रकल्पासारखीच आहे. या प्रकल्पांची सुरुवात होण्यापूर्वी पिण्याच्या पाण्याशी संबंधी प्रकल्प आणि धोरणांची मोठी पार्श्वभूमी आहे. ७०च्या दशकातील विहिरी, ८० आणि ९० च्या दशकातील केंद्रीय पाणीपुरवठ्याच्या योजना, यासारख्या आधीच्या योजनांमधून गावपातळीवरील स्थानिक पाणीपुरवठ्याच्या योजना राबवणे योग्य होईल असा निष्कर्ष पुढे आला.

या प्रकल्पांची दोन उद्दिष्टे होती:

१. पाण्याच्या आणि स्वच्छतेच्या अधिक कार्यक्षम आणि शाश्वत सुविधा उपलब्ध करणे.

२. पाण्याचे व्यवस्थापन स्थानिक लोकांकडे सोपवून विकेंद्रीकरण करणे.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीतून पुढील गोष्टी साध्य करणे अपेक्षित होते: प्रत्येक व्यक्तीला दिवसाला ४० ली. पाणीपुरवठ्याची खात्री, पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण कमी करणे, सत्तेचे विकेंद्रीकरण, ग्रामसभेमार्फत निर्णय आणि अधिकार पदांवर स्त्रियांची नियुक्ती.



प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसे गावपातळीवरील पाणी समित्यांना देण्यात आले. या योजनेचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी या योजनेचे स्वतंत्र खाते तयार करण्यात आले आहे. योजनेमध्ये स्त्रियांच्या सबलीकरणाला महत्त्व देण्यात आले आहे. त्यासाठी पाणी समित्यांवर ५०% कोटा स्त्रियांसाठी ठेवण्यात आला आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या सबलीकरणासाठी विशेष निधीचीही तरतूद केली आहे. या निधीचा उपयोग प्रामुख्याने स्त्रियांसाठी बचतगट सुरू करण्यासाठी आणि त्याद्वारे आर्थिक सबलीकरण घडवण्यासाठी करण्यात येतो.

पाण्यातील क्षेत्रसुधार धोरणामुळे स्त्रियांना विकेंद्रीत व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठी मिळणारी संधी तसेच त्यांचे सबलीकरण याचा विचार करत असताना तो व्यापक संदर्भात करायला हवा. विशेष करून विकेंद्रीकरणामुळे अधिक कार्यक्षम, प्रभावी, समन्यायी आणि शाश्वत पद्धतीने पाण्याचे व्यवस्थापन होते आहे अथवा नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## व्यवस्थापनातील कार्यक्षमता, समानता आणि शाश्वतता

विकेंद्रीकरणात व्यवस्थापन कार्यक्षम होण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतुदीची तसेच मनुष्यबळाची आवश्यकता होती. सहदायी संस्थांच्या सहभागाशिवाय विकेंद्रीकरणकरणाची उद्दिष्टे साध्य करणे केवळ अशक्य होते. पाणी समित्यांकडे व्यवस्थापनाची पुरेशी क्षमता तसेच योग्य तांत्रिक माहिती नसल्याने या संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. उदाहरणार्थ नारी समता मंच या संस्थेने एका गावात इतर पर्यायांच्या अनुपलब्धतेमुळे छतावरील पाणी संकलनाची (Roof water harvesting) योजना राबवली.

**सहभागातील समानता**

स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वाचा विचार करता सर्व सामाजिक गटांसाठी असणारा कोटा भरला गेला असल्याचे लक्षात येते. अभ्यासासाठीच्या आमच्या नमुन्यामध्ये भूमिहीन, दलित, उच्चजातीय अशा सर्व स्त्रियांचा समावेश होता. परंतु समानतेचे तत्त्व एवढ्यावरच संपुष्टात येते कारण अध्यक्ष, सचिव यासारख्या पदांवर असणाऱ्या स्त्रिया ह्या उच्चजातीय आहेत. दलित, आदिवासी आणि गरीब स्त्रियांची बैठकांमधील उपस्थिती आणि बैठकांमधील मतप्रदर्शन दोन्ही मर्यादित असल्याचे स्पष्ट होते. योजनेमध्ये विविध घटकांच्या सहभागासाठी निर्माण केलेल्या संधी ह्या योजनेतील इतर रचनेमुळे प्रभावी ठरू शकत नाहीत. योजना पूर्ण करण्यासाठी केवळ १८ महिन्यांचा कालावधी उपलब्ध असाना त्यामध्ये पूर्वापार चालत आलेल्या या असमानता संपुष्टात आणणे शक्य नाही.

**पाण्याच्या वाटपातील समानता**

पाणी पुरवठ्याच्या वेळा, पाणीपट्टी, पाण्याची उपलब्धता आणि दर्जा याबाबतच्या समस्या प्रकल्पानंतरही अनेक गावांमध्ये न संपल्याने क्षेत्रसुधार कार्यक्रमाच्या प्रभावितेबद्दल प्रश्न उपस्थित केला जात आहे. अभ्यासलेल्या सर्व गावांमध्ये लोकांनी, समित्यांवरील विविध गटाच्या स्त्रियांनीही 'वापरणाऱ्या लोकांनी पाण्यासाठी किंमत द्यायला हवी' हा मुख्यप्रवाहातील विचार आत्मसात केला आहे. असे असले तरी गरीब लोकांना हे परवडण्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. अनेक गावांमध्ये वसूलीबाबतचे नियम शिथिल करून गरीब, भूमिहीन- मजुरी करणाऱ्या कुटुंबांकडून भांडवलातील लोकवाटा न घेण्याचा निर्णय घेतला गेला. परंतु काही गावांमध्ये लोकांनी भांडवलातील लोकवाटा जमा करण्यास विरोध केल्याने त्या गावांमध्ये योजनेचे काम रखडले गेले किंवा ती गावे योजनेतून पूर्णपणे वगळली गेली.

पाण्याच्या वाटपामधील असमानता सांगितली जात नसली तरी प्रत्यक्षात दिसून येत होती. पाणीपट्टीच्या वसूलीसाठी ते अधिक सोयीस्कर आहे असे सांगून वैयक्तिक नळ देण्याचे धोरण राबवण्यात येत आहे. अनेकदा पाईपलाइनची रचना समतेचे तत्त्व लक्षात न घेता केली जाते. त्यामुळे गावाच्या परिघाजवळ असणाऱ्या दलित किंवा आदिवासी कुटुंबांना अनियमित पाणी पुरवठा होतो.

**शाश्वतता**

व्यवस्थापनाच्या नविन रचनेबाबत गावांमध्ये आत्ता उत्साह दिसत आहे, परंतु भविष्यात ती टिकून राहिल अथवा नाही हा प्रश्न पूर्णपणे सोडवला गेलेला नाही. एकदा प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर योजनेचे हस्तांतरण केले जाईल अथवा नाही, नंतर पाणीपट्टीची वसूली कोण करणार याबाबत पुरेशी स्पष्टता नसल्याचे दिसते.

सर्व योजनेचे यश पाण्याच्या स्रोताच्या शाश्वततेवर अवलंबून आहे. स्रोत निवडत असताना त्याच्या शाश्वततेचा विचार केला असल्याची खात्री देण्यात येत आहे. याबाबत पुढील वर्षामध्ये अधिक चांगत्या प्रकारे अभ्यास होऊ शकेल. परंतु आमच्या निरिक्षणातून अनेकदा स्रोत निवडत असताना लक्षात घ्यावयाच्या अनेक गोष्टी लक्षात न घेतल्याचे दिसून आले.



## उत्तरदायित्व आणि व्यवहारातील पारदर्शकता

पाण्याच्या योग्य कारभारासाठी आवश्यक असणाऱ्या तत्त्वांमध्ये उत्तरदायित्व आणि पारदर्शकता ह्या दोन गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी त्यांचे मोजमाप करणे कठीण आहे. परस्परांना उत्तरदायी असणारे घटक अनेक आहेत. उदाहरणार्थ: सरकार आणि गावकरी, पाणी समिती आणि लाभधारक, सहदायी संस्था आणि सरकार तसेच सहदायी संस्था आणि पाणी समिती. कामाची प्रगती किंवा खर्चाचे तपशील यांबाबत अहवाल देणे यासारखे खालून वर असे उत्तरदायीत्वाचे अनेक मार्ग आहेत. मात्र सरकारकडून लोकांना किंवा सहदायी संस्थांना असे उत्तरदायीत्वाचे बंध अस्तित्वात नाहीत.

ज्याठिकाणी प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरू झाला आहे त्याठिकाणी आता पाणी समितीच्या बैठका नियमित होत नाहीत, तसेच समिती सभासदांकडून इतरांना पुरेशी माहिती पोचवली जात नाही असे दिसते.

सरकारच्या धोरणांप्रमाणे दर दिवशी व्यक्तीगणिक ४० ली. पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने पाणी वाटपाची पद्धत ठरवण्यात आली. परंतु पाण्याच्या उपलब्धतेची अनियमितता पाहता कोणत्याही गावांमध्ये त्यासंबंधी ठराविक नियम केलेले नव्हते. पाणी उपलब्ध असताना आवश्यक तेवढा पाण्याचा वापर करावा हे अनौपचारीक धोरण चालू शकते परंतु पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या काळात पुन्हा एकदा आधीप्रमाणेच स्त्रियांना प्रश्नांचा सामना करावा लागणार.

आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेबाबत चांगला अनुभव आला. पाणी समितीच्या व्यवहारांची कागदपत्रे चांगल्याप्रकारे ठेवली गेली होती. तसेच प्रकल्पाच्या खर्चाबाबतचे तपशील सर्वांना समाजतील अशाप्रकारे गावातील भिंतीवर लिहिलेले असत. गावातील लोकांना प्रकल्पाबाबत तसेच त्याच्या खर्चाबाबत साधारणपणे माहिती होती असे दिसून आले.

## स्त्रियांचा सहभाग

एकूण स्त्रियांच्यात योजनेबाबत आणि त्यामधील त्यांच्या सहभागाबाबत मोठ्या प्रमाणात उत्साह होता. प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात स्त्रिया सामाजिक क्षेत्रात वावरायला लागल्या हे या योजनांचे श्रेय म्हणावे लागेल. महिला ग्रामसभा, बचतगट यांच्यामुळे त्यांच्या सहभागावर सकारात्मक परिणाम झाला आहे. गावात चालू असणाऱ्या योजनेबाबत स्त्रियांना कमी अधिक प्रमाणात ज्ञान आहे असे दिसते. अर्थात सहभाग आणि किती प्रमाणात माहिती आहे याचे प्रमाण यामध्ये गटांप्रमाणे फरक दिसून येतो. एकूण दलित आणि आदिवासी स्त्रियांच्यात हे प्रमाण कमी आहे. तसेच उच्चजातींमधीलही ज्या स्त्रिया प्रथमच सामाजिक क्षेत्रात आल्या त्यांच्यात हे प्रमाण तुलनेने कमी आहे.

स्त्रिया मोठ्या प्रमाणात योजनेत सहभागी होत असल्या तरी बहुसंख्य स्त्रियांसाठी सहभाग हा बैठकांना उपस्थित राहणे आणि प्रशिक्षण आणि अभ्याससहलींमध्ये सहभागी होणे यापुरताच मर्यादित राहिला आहे. बचतगटांची स्थापना, त्याद्वारे छोट्या रकमांच्या कर्जांचे वाटप आणि त्यामधून स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण एवढीच सबलीकरणाची व्याप्ती राहिली आहे. खरेदी, प्रकल्पाची देखभाल यांसारख्या उपसमित्यांवरही स्त्रियांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जात असला तरी प्रकल्प ठराविक काळात पूर्ण करण्याचे बंधन असल्याने ह्या प्रक्रिया प्रभावीपणे होऊ शकत नाहीत.

काही स्त्रियांमध्ये पाणी समित्यांमधील सहभागामुळे सबलीकरणाच्या प्रक्रियेला निश्चित हातभार लागला आहे. यामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जागरूक असणाऱ्या सहदायी संघटनांचे योगदान मोठे आहे. पाणी समितीच्या माध्यमातून क्षेत्रात सहभागी झाल्याने स्त्रियांसाठी कौटुंबिक पातळीवर मात्र विशेष फरक झालेला नाही. कुटुंबामध्ये कामाची विभागणी, निर्णयप्रक्रियेतील सहभाग किंवा संसाधनांवरील हक्क यांसारख्या अनेक बाबतीत परिस्थिती बदललेली नाही.

स्त्रियांचा अर्थपूर्ण सहभाग ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे आणि ती १८ महिन्यांच्या मर्यादेत पूर्ण होऊ शकत नाही. स्त्रियांना अनेक प्रकारे असणारी बंधने तोडून अर्थपूर्णरित्या सहभागी होण्यासाठी केवळ स्त्रियांचा नाही तर एकूण समुदायाचा दीर्घकालीन सहभाग आवश्यक आहे.

## धोरणात्मक सूचना

अभ्यासातील निष्कर्षांवरून दिसून येते की घरगुती वापराच्या पाण्यातील विकेंद्रीकरण प्रभावी व्हायचे असेल तर खालील गोष्टी आवश्यक आहेत.

१. विकेंद्रीकरण अधिक प्रभावी होण्यासाठी प्रकल्पाच्या रचनेमध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यातील काही प्रमुख बदल पुढील प्रमाणे सांगता येतील: प्रकल्प पूर्ण करण्याच्या १८ महिन्यांच्या मुदतीत वाढ, सक्षम सहदायी संस्थांची नियुक्ती तसेच त्यांची पुरेशी क्षमता बांधणी, बचतगटांवर सध्या असणारा भर कमी करून स्त्रियांच्या एकूण सामाजिक क्षेत्रातील सहभागावर भर आणि पाणी समित्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणांमध्ये शाश्वततेशी निगडीत तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षणाचा समावेश.

२. शाश्वत आणि सुरक्षित पाणीपुरवठ्यासाठी तसेच एकत्रित परिणामासाठी गावातील इतर पाणी संसाधनांच्या विकास कार्यक्रमांशी ही योजना जोडून घ्यायला हवी. तसेच स्थानिक पातळीच्या पुढे जाऊन एका पाणलोट क्षेत्रात किंवा नदीपात्रात असणाऱ्या गावांसाठी एकत्रित नियोजन करायला हवे.

३. भांडवलातील लोकवाटा आणि पाणीपट्टीची वसूली याचे विकेंद्रीकरण यापेक्षा विकेंद्रीत नियोजन आणि अंमलबजावणी यावर भर देण्याची आवश्यकता आहे. लोकांनी भांडवलातील वाट्यासाठी आर्थिक तरतूद करण्यावर अधिक भर दिल्याने पाण्यासारख्या प्राथमिक सार्वजनिक सेवेपासून काही गावे किंवा काही घटक वंचित राहू शकतात.

४. सहभाग हा धोरणांमधील तरतुदींबरोबरच सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबून असतो. पुरुषसत्ताक व्यवस्था, जात आणि वर्ग हे घटक अनेक प्रकारे सहभागात अडथळे निर्माण करतात. माहितीचा अभाव, आर्थिक तरतूद करण्याची अशक्यता, व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठीच्या क्षमतांचा अभाव ह्या गोष्टी स्त्रिया, दलित, आदिवासी आणि गरीबांच्यात अधिक प्रकर्षाने दिसून येतात. ह्या गोष्टी सहभागाचे स्वरूप ठरवतात, त्यामुळे पुर्वापार वंचित असे हे घटक परत सहभागापासून वंचित राहतात. ह्यामध्ये बदल घडवायचा असेल तर केवळ कोटा देऊन उपयोग नाही तर त्यासाठी अधिक दीर्घकालीन बदल समाजव्यवस्थेत व्हायला हवेत. या वंचित घटकांचा सहभाग वाढवण्यासाठी खालील गोष्टी आम्हाला आवश्यक वाटतात.

- गावपातळीवर प्रभावी संवाद साधू शकतील अशा लोकगीत, पथनाट्य अशा माध्यमांमधून लिंगभाव आणि पाणी यांच्याशी निगडीत विविध असमानतांबाबत जागृती.
- सामाजिक वंचित घटकांसाठी विविध प्रकारचे क्षमता बांधणीचे उपक्रम: उदाहरणार्थ हातपंपाच्या दुरुस्तीचे तांत्रिक प्रशिक्षण किंवा स्त्रियांसाठी नेतृत्त्व विकास आणि संवादकौशल्याचे प्रशिक्षण इत्यादी.

५. प्रकल्पामधील सामाजिक संस्थांची भूमिका, सामाजिक संस्थांनी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे एवढीच मर्यादित न ठेवता गावपातळीवर काम करणाऱ्या संस्था, संघटना, सामाजिक चळवळी यांना धोरणांच्या आखणीसाठी अधिक प्रभावीपणे सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

हे पत्रक सोपेकॉम (पुणे), उत्थान (अहमदाबाद) आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था (मुंबई) यांनी संयुक्तपणे केलेल्या "Water Rights as Women's Rights ? Assessing the Scope for Women's Empowerment through Decentralised Water Governance in Maharashtra and Gujarat' या अभ्यासावर आधारित आहे. हा अभ्यास जून २००६ ते डिसेंबर २००८ या काळात केला असून त्यासाठी IDRC या कॅनडामधील संस्थेने अर्थसहाय्य केले होते.

संपर्क :

सीमा कुलकर्णी

**सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टीसिपेटिव्ह इकोसिस्टीम मॅनेजमेंट (सोपेकॉम)**

१६; काळे पार्क, सोमेश्वरवाडी रोड, पाषाण, पुणे ४११००८.

दूरध्वनी : ०२०-२५८८०७८६, फॅक्स : ०२०-२५८८६५४२

इमेल : feminism.soppecom@gmail.com वेबसाईट : www.soppecom.org

प्रा. छाया दातार,

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**

पोस्ट बॉक्स नंबर ८३१३, सायन ट्रॉम्बे रोड, देवनार, मुंबई ४०००८८.

दूरध्वनी : ०२०-२५५६३२९०,

इमेल : chhayadatar@vsnl.net

वेबसाईट : www.tiss.edu